<u>**Efforts to Make Plastic Free Environment**</u>



# State Level Best from Waste Competition



**Disposing Canteen, Hostel, Mess Food and Water Waste**







REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA


REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA

<u>**Disposable Bio-Hazardous Waste**</u>









# नांदेड शहर

प्रजावाणी ■ शनिवार, दि. २३ मार्च २०१९ ■ ५

## इकोफ्रेंडली कमिटी व नागरी कृती समितीच्यावतीने पर्यावरणपूरक होळी

नांदेड, दि. २२ : होळी सणानिमित्त इको फ्रेंडली कमिटी सायन्स कॉलेज व नागरी कृती समिती नांदेडच्या वतीने पर्यावरण पूरक आज रोजी होळी साजरा करत असताना स्वच्छ शहर व सुंदर शहर या संकल्पनेतून व पर्यावरणाच्या संवर्धन व रक्षणाकरिता विवेकनगर व सायन्स कॉलेज परिसरातील प्लॅस्टीक व सुका कचरा जमा करून तो मनपा प्रशासनाच्या सहकार्याने नेण्यात आले.

याप्रसंगी डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी विशेषता तरूण पिढीला व्यसनापासून दूर रहा, वाईट चालीरिती अनिष्ठ रूढी परंपरापासून दूर राहण्याचे संदेश देत वाईटाची होळी यामध्ये दहशतवाद, धार्मिक कट्टरता जातीयता, भष्ट्राचार इत्यादी विरूध्द होळी व पर्यावरणाच्या रक्षणासाठी झाडे तोडू नका, लाकडे जाळू नका, कोरड्या नैसर्गिक रंगाचा वापर करा व प्लाष्टीक वापर करू नका इत्यादी गोष्टींकडे लक्ष केंद्रीत करून आजचा होळी सण साजरा करा. होळी करा लहान व पोळी करा दान. असा संदेश या सणानिमित्त देण्यात आला. यावेळी माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या पुढाकाराने नागरी कृती समिती मागील दोन वर्षापासून शहरामध्ये स्वच्छता बाबतीत अनेक ठिकाणी काम करत आहेत. त्या अनुषंगाने आज होळी सनानिमित्त सायन्स महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक व परिसरातील नागरीकासोबत नागरी कृती समितीचे सदस्य मोठया प्रमाणात सहभागी झाले. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी संयोजक प्रा. डॉ. लक्ष्मण शिंदे, बालाजी टिमकीकर, प्रा. डॉ. एन. पवार, प्रा. अविनाश घाडगे, प्रा. वि गायकवाड, शिवलिंग चोंडे, प्रा. धु के. एस. यांनी परिश्रम घेतले यावेळ रविंद्र रगटे, अॅड सुरेश चाकोते, डॉ. कोकीळ, श्रीमती पुरण शेट्टीवार, तुम्मवाड, प्रा. शामसुंदर गोरे, प्रा. एस बारूळे अशिष नेरलकर, भगवान क सौ. बोडके, सौ. तेलंगे व इत्यादीसह विद्यार्थी या स्वच्छ मोहिमेत सहभागी



शहर विशेष

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि.२१ मार्च २०१९ २

# नागरी कृती समितीकडून पर्यावरणपूरक होळी

**इको फ्रेंडली कमिटी :** सायन्स, पीपल्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा लक्षणीय सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** होळी सणानिमित्त इको फ्रेंडली कमिटी सायन्स कॉलेज व नागरी कृती समिती, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यात आली. स्वच्छ शहर व सुंदर शहर या संकल्पनेतून पर्यावरणाच्या संवर्धन व रक्षणाकरता प्लास्टिक व सुका कचरा सायन्स कॉलेज परिसरात जमा करून तो मनपा प्रशासनाच्या सहकार्याने शहराबाहेर नेण्यात आला.

याप्रसंगी माजी खा. डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी तरुण पिढीला मार्गदर्शन केले. ते म्हणाले, तरुणांनी व्यसनापासून दूर रहावे, वाईट चालीरीती अनिष्ट रुढी-परंपरापासून दूर यावे आवाहन केले. तसेच वाईटाची होळी करून यामध्ये दहशतवाद, धार्मिक कट्टरता, जातीयता, भ्रष्टाचार आदी नष्ट करावे. त्याचबरोबर पर्यावरणाच्या रक्षणासाठी झाडे तोडू नका, लाकडे जाळू नका, कोरड्या नैसर्गिक रंगांचा वापर करा, प्लास्टिकचा वापर करु नका आदी गोष्टींकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले. त्याचबरोबर होळी करा लहान, पोळी करा दान असा संदेश डॉ. काब्दे यांनी दिला. यशस्वीतेसाठी संयोजक प्रा.डॉ.लक्ष्मण शिंदे, बालाजी टिमकीकर, प्रा. डॉ. एन. पी. पवार, प्रा.अविनाश घाडगे, प्रा.विशाल गायकवाड, शिवलिंग चौंडे, प्रा. के. एस. धुतमल आदींनी परिश्रम घेतले.

यावेळी ॲड.रवींद्र रगटे, ॲड.सुरेश चाकोते, डॉ.पुष्पा कोकीळ, तेलंगे यांच्यासह सायन्स कॉलेज आणि पीपल्स कॉलेजमधील विद्यार्थी - विद्यार्थिनींसह प्राध्यापकांनी स्वच्छ मोहिमेत सहभाग नोंदविला.

दरम्यान, शहरात शेणाच्या गवऱ्या तसेच वेगवेगळ्या प्रकारची झाडे, तसेच वाळलेली लाकडे एकत्र करून होळी पेटविण्यात आली. तर काही ठिकाणी केवळ गौरीच्या होळीची पूजा करण्यात आली.

## शहरात ठिकठिकाणी पेटली होळी...

भारतीय संस्कृतीत परंपरेनुसार होळी हा सण साजरा करण्यात येतो. बुधवारी सायंकाळी शहरातील प्रत्येक गल्लीत तसेच मंदिर आणि अनेकांच्या घरांसमोर विधीवत पूजा करून तसेच पूरणपोळीचा नैवेद्य दाखवून होळी साजरी करण्यात आली. बच्चे कंपनीचा उत्साह यावेळी पहायला मिळत होता. ठिकठिकाणी होळी पेटवून बच्चे कंपनींनी रंगोत्सवास सुरुवात केली. एकमेकांवर रंगांची उधळण करीत 'बुरा न मानो होली हैं' अशा घोषणा देत रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांना आवर्जून रंग लावला. तर शुक्रवारी साजरा होणाऱ्या धूळवडची जय्यत तयारी केल्याचे दिसून आले. रंगोत्सव खेळून झाल्यानंतर बच्चे कंपनींकडून डब्बा पार्टीचे आयोजनाचाही बेत करण्यात आल्याचे दिसून आले.

'रंग खेळताना वीज

MI DUAL CAMERA

## Shram-Sanskar and National Integration






**Water and Feed for Birds**







**Bio-gas Plant for Solid and Liquid Waste Management**




**Vermi-Compost Unit for Solid Waste Disposal**

